# प्रेसनोट दि. २४/१२/२०२४

## अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेची धडक कारवाई

## "सुमारे दोन वर्षे पोलीसांना गुंगारा देणारा सराईत दरोडेखोर ताब्यात"

**मा पोलीस उप आयुक्त, गुन्हे संदिप डोईफोडे, मा सहा पोलीस आयुक्त, गुन्हे २, बाळासाहेब कोपनर यांचे मार्गदर्शनाखाली** अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखे कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, संतोष पाटील यांनी अंमली पदार्थ विरोधी पथकातील अधिकारी व अमंलदार यांची पथके तयार करुन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत पाहिजे आरोपी, तडीपार आरोपी यांचा शोध घेवुन त्यांचेवर कायदेशीर कारवाई करणेबाबत आदेशीत केले. दिनांक २३/१२/२०२४ रोजी अमंली पदार्थ विरोधी पथकाचे सपोनि सचिन कदम व पथक हे देहुरोड बाजार परीसरात गस्त करीत असताना **पोलीस अंमलदार किशोर परदेशी** यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, देहुरोड बाजरातील गणेश मंदिराचे मागे वाकड पोलीस स्टेशन गुरनं १५४/२०२३ भारतीय दंड संहिता कलम ३९५, ३४१, ३२३, ४२७, ५०४ मधील पाहिजे आरोपी नामे विकी शर्मा हा थांबलेला आहे. मिळालेल्या बातमीवरुन सपोनि सचिन कदम यांचे पथकाने त्यास शिताफिने ताब्यात घेवुन त्यास त्याचा नाव व पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव विकी शर्मा उर्फ अमन सुरेंद्र विश्वकर्मा, वय २३ वर्षे, रा अतुल राऊत यांचे घराचे शेजारी, मदारी चाळ, मामुर्डी गाव, देहुरोड, पुणे असे असल्याचे सांगितले. त्याचेकडे वाकड पोलीस स्टेशन गुरनं १५४/२०२३ भारतीय दंड संहिता कलम ३९५, ३४१, ३२३, ४२७, ५०४ या गुन्हयाचे अनुशंगाने चौकशी केली असता त्याने सांगितले की, सन २०२३ मध्ये शिवजयंतीचे दिवशी **मी व माझे मित्र नामे १. प्रज्वल मळेकर, २. श्री जाधव, ३. किरण कांबळे, ४. शुभम कोळी, ५. सुरज चलवादी व ६. अदित्य भंडारे** असे तापकीर चौक येथे शिवजयंती मिरवणुकी करीता आलो होते. तेथे आमची अनोळखी इसम नाव व पत्ता माहिती नाही याचेशी भांडणे झाली. आम्ही सर्वांनी त्यास शिवीगाळ करुन मारहाण करुन त्याचेकडील रोख रक्कम काढुन घेवुन तेथुन निघुन गेलो. पोलीस मला शोधतील म्हणुन मी मुंबई येथे माझा मित्र अभिषेक पवार याचेकडे जावुन राहिलो.

आरोपी नामे विकी शर्मा उर्फ अमन सुरेंद्र विश्वकर्मा, वय २३ वर्षे, रा अतुल राऊत यांचे घराचे शेजारी, मदारी चाळ, मामुर्डी गाव, देहुरोड, पुणे यास पुढील कारवाईकरीता वाकड पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात आले आहे.

**आरोपी नामे विकी शर्मा उर्फ अमन सुरेंद्र विश्वकर्मा याचेवर पुढीलप्रमाणे गुन्हे दाखल आहे.**

1) **देहुरोड पोलीस स्टेशन गु.र.क्र. ४९३/२०२० भादविक ३९५, ३४१, ३३७**
2) **खडक पोलीस स्टेशन गु.र.क्र. १४२/२०२३ पोस्को कलम ८, १२ व भादविक ३६३, ३६६**
3) **देहुरोड पोलीस स्टेशन गु.र.क्र. ६०५/२०२१ भादविक ३९४, ४२७, ४५२, ५०४, ५०६, ३४ आर्म ॲक्ट ४(२५) म.पो.का.क. ३७(१)(३), १३५ क्रि.लॉ.अ. कलम ७**

सदरची कारवाई मा. विनयकुमार चौबे, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड आयुक्तालय, मा. शशिकांत महावरकर, सह पोलीस आयुक्त, मा. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, मा.संदिप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, मा. विशाल हिरे, सहा पोलीस आयुक्त, गुन्हे १, मा. बाळासाहेब कोपनर, सहा पोलीस आयुक्त, गुन्हे २ यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पाटील, सहायक पोलीस निरीक्षक सचिन कदम, पोलीस अंमलदार जावेद बागसिराज, किशोर परदेशी, मयुर वाडकर, शिल्पा कांबळे व गणेश कर्पे यांचे पथकाने केली आहे.

**(संदिप डोईफोडे)**
पोलीस उप आयुक्त,
गुन्हे, पिंपरी चिंचवड